// गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**श्री. साकेत मदन दशपुत्र**
ए.सी.ए.,सी.एम.ए.,एम.बी.ए.(वित्त)
वित्त व लेखा अधिकारी
दुरध्वणी क्र. : ०७१३२-२२३१०६

संकेतस्थळ : www.unigug.ac.in
ई.मेल :faogug@gmail.com
ई.मेल :Fao@unigug.ac.in
भ्रमणध्वणी : ७५८८९७२१८८

जावक क्रमांक/गो.वि./वि.ले.वि./२० /२०२२

दिनांक १२/०४/२०२२

## परिपत्रक

गोंडवाना विद्यापीठाच्या रोखपटलावरून रोख, धनाकर्ष इत्यादी माध्यमाने रक्कम स्विकारून त्याबाबतची रिसिप्ट स्लिप संबंधीतांना दोन प्रतीत दिली जाते. भरणा केलेल्या रक्कमेची रिसिप्ट स्लिप मिळाली आहे याची खात्री करणे, सदर रिसिप्ट स्लिप सांभाळुन ठेवणे वा आवश्यक तिथे या स्लिपचा वापर करणे ही जबाबदारी संबंधीत रक्कम भरणा करणाराची आहे.

अलिकडच्या कालावधीत रोखपटलावर जुनी रिसिप्ट स्लिप गहाळ झाल्यामुळे जुन्या रिसिप्ट स्लिपची डुप्लिकेट स्लिप मिळण्यासाठी वारंवार विचारणा होत असते तसेच यासंबंधीचे लिखीत अर्जसुध्दा प्राप्त होत असतात. अशा प्रसंगी नाममात्र रू. १००/- इतके शुल्क आकारून संबंधीतांकडुन विद्यापीठास रक्कम प्राप्त झाली असल्याचे प्रमाणपत्र जारी करण्यास मा. वित्त व लेखा समितीने दिनांक १६.०२.२०२२ च्या सभेतील बाब क्र. ६ वर पारीत ठरावान्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

सबब यापुढे डुप्लिकेट रिसिप्ट स्लिपची मागणी करणाऱ्यांनी रू. १००/- इतके नाममात्र शुल्काचा भरणा विद्यापीठाकडे केल्यानंतरच त्याबाबतचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडुन जारी करण्यात येईल यांची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

११/४

**(साकेत मदन दशपुत्र)**
**वित्त व लेखा अधिकारी**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी :-**

१) मा. कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. सर्व सांविधिक अधिकारी/विभाग प्रमुख/संचालक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. सर्व प्राधिकरणांचे / मंडळांचे / समित्यांचे सदस्य, परिक्षक, मॉडरेटर, विविध मंडळे तसेच विद्यापीठाशी संबंधीत कार्याकरीता विद्यापीठात उपस्थित राहणारे मान्यवर इ.
६) मा. प्राचार्य / प्राध्यापक, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
७) विद्यापीठाचे सर्व अधिकारी व कर्मचारी
८) सिस्टीम ॲनालिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस्तव.